## महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२/ श्रावण ३१, १९४४ शके

११४. महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) प्रमाणे बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या आणि गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना देणाऱ्या सदस्यांची क्रमवार सूची खालीलप्रमाणे आहे :-

(१) **श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३३**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिति स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १७**

"राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासिय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ.बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५९**

"राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांव उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातू लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैदयकीय अधिकारी स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **<u>श्री. सुरेश वरपुडकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. १०९</u>**

"राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **<u>श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४</u>**

"पुणे जिल्ह्यात खडकवासला, पानशेत, वरसगाव धरणाच्या जलाशयाच्या परिसरात रेस्टॉरंट, फार्म हाउस, हॉटेल व्यावसायिक, कंपन्यांमधील कारखान्यांतील रसायनयुक्त प्रदूषित सांडपाणी तसेच मैलामिश्रित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता सोडण्यात येत असल्याने या धरणांच्या पाण्यावर अवलंबून असलेले मानव, जलचर प्राणी, वनस्पती, पक्षी यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याने या धरणांच्या जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून त्यावर प्रभावीरीत्या आळा घालण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारच्या मदतीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २२ ऑगस्ट, २०२२

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**<u>याची प्रत:</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)